**विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेसाठीची जाहिरात**

क्रमांक :२१/विपोमनि/सेवा करार नियुक्ती/२०१९/६६४ दिनांक : ६/२/२०१९

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७ डिसेंबर २०१६ अन्वये विवक्षित सेवा/कामांसाठी विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करुन सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने नेमणूका करावयाच्या आहेत. त्यामुळे खालील अर्हता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी खालील नमुन्यात आवश्यक प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रतीसह अर्ज, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, ६ वा मजला, कोंकण भवन सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांचे नांव दि.१५/२/२०१९ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यन्त पोहचतील या बेताने पाठवावेत. तदनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अ) **नामिकासूचीत नियुक्त करावयाच्या एकुण व्यक्तींची संख्या** - प्राप्त झालेल्या अर्जांपैकी एका उमेदवाराची करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येईल.

ब) **विवक्षित कामाचे स्वरुप** - कोंकण परिक्षेत्रातील घटक कार्यालयांमधील कनिष्ठ श्रेणी लिपीक/वरिष्ठ श्रेणी लिपीकांच्या पुर्वीपासुनच्या सेवाजेष्ठता यादया सुधारीत करणे तसेच मानीव दिनांकाबाबतची प्रकरणे तपासणे.

क) **अर्हता व अनुभव –**

१) आस्थापनाविषयक बाबी यामध्ये पदोन्नत्या, सेवाजेष्ठता सूच्या, मानीव दिनांक इ.आस्थापनाविषयक बाबींचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.

२) करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

क) **कालावधी** :- सदर कामासाठी करार पध्दतीने प्रथम तीन महिन्यासाठी नियुक्ती करण्यात येईल.

ड) **देय मासिक परिश्रामिक** –

१) नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्ती वेतन वगळुन) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.

२) ज्या सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा निवृत्तीवेतनार्ह नाहीत त्यांना करार पध्दतीने नियुक्त करताना, सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या वेतनाचे आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित महागाई भत्त्याची रक्कम केवळ हिशेबासाठी परिगणित करुन त्याआधारे मासिक पारिश्रामिक निश्चित करण्यात येईल.

३) भत्ते - उक्त तरतुदीनुसार निश्चित होणा-या मासिक परिश्रामिकाच्या जास्तीत २५% इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम "निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या भत्त्यापोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ.बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात येईल.

४) प्रवासभत्ता व दैनिक भत्ता – करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

**इ) इतर अटी व शर्ती** –

१) करार पध्दतीने नियुक्त देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामा व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेले व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

७) प्राप्त झालेल्या अर्जातुन उमेदवारांची निवड करण्यात येईल. व याबाबत सक्षम प्राधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

८) नियुक्ती केलेल्या उमेदवारास करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील अशा आशयाचे बंधपत्र/हमीपत्र देणे आवश्यक राहील.

तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी सोबत जोडलेल्या आवेदनपत्रात दिनांक १५/२/२०१९ पर्यत या कार्यालयास अर्ज सादर करावेत.

**( नवल बजाज )**

विशेष पोलीस महानिरीक्षक,कोंकण परिक्षेत्र,नवी मुंबई.

**विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई कार्यालयात शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी नेमणूक होणेसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना**

एका फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा. व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा.

कार्यालयीन उपयोगासाठी

१. अर्ज क्र. | | | | |

२. अर्ज स्विकारल्याचा दिनांक

३. अर्ज स्विकारण्याची स्वाक्षरी दिनांकासहित –

सूचना :- अर्ज टंकलिखित अथवा स्वहस्ताक्षरात करावा.
अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.
अर्जदाराने माहिती फक्त मराठीत लिहावी. व # दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.
*आवश्यक नसेल तेथे खोडावे.

## अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव :- आडनांव नांव वडिलांचे/पतीचे नांव

मराठीत ..........................................................................

# इंग्रजीत : | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

२. पत्रव्यवहाराचा पत्ता ..............................................................

तालुका ............... जिल्हा................ पिनकोड | | | | | | |

३. कायमचा पत्ता ..............................................................

तालुका ............... जिल्हा................ पिनकोड | | | | | | |

४. दूरध्वनी क्रमांक (लँडलाईन) ............... मोबाईल क्रमांक | | | | | | | | | | |

ई-मेल आयडी ....................................................................

५. जन्मदिनांक :

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| दिवस | | महिना | | वर्ष | | | |

६. दिनांक ३१/१/२०१९ रोजीचे वय

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| वर्षे | | महिना | | दिवस | |

७. लिंग : पुरुष - ☐ महिला - ☐

८. धर्म - ☐ जात - ☐

९. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? होय - ☐ नाही- ☐

योग्य असेल त्या ठिकाणी ( √ ) अशी खुण करावी.

## ब) अर्जदाराच्या अनुभवाची माहिती

१०. अनुभव –

अ) काम केलेले कार्यालयांचा तपशिल

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | कालावधी | केलेल्या कामाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

ब) उमेदवाराने आस्थापनाविषयक पदोन्नती, सेवाजेष्ठता यादया, मानीव दिनांक याबाबतच्या कामे हाताळली आहे अगर कसे ? असल्यास त्याबाबतचा तपशिल -

.....................................................................................

.....................................................................................

११. अर्जदार यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित आहे का ? किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली आहे का ? (होय/नाही)

..................

१२. अर्जदार शारीरीक, मानसिक या आरोग्याच्या दृष्टीने सक्षम आहे का ? (होय/नाही)

................

१३. सदर अर्जात भरलेला सर्व मजकूर खरा आहे व अर्जदारास मान्य आहे. सदरबाबत कोणतीही माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास त्याबाबत उचित कार्यवाही करण्यास अर्जदाराची कोणतीही हरकत राहणार नाही.

१४. निवड प्रकियेबाबतची कार्यवाही करणेचे तसेच निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही टप्प्यावर केव्हाही रद्द करण्याचे अधिकार सर्वस्वी नियुक्ती प्राधिका-यास राहील.

वरील सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन त्या अटी व शर्तींच्या अधीन राहुन मी सदरचा अर्ज करीत आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी व संपूर्ण नांव

# अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री/सौ/कु .................................................. याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील. व त्याबाबतीत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची सही
(दिनांकासह )